ePaper

# “जितेंद्र आव्हाड भांबावलाय, पागल झालाय”, विजय वडेट्टीवारांची टीका




| वर्ष - 7 | अंक - 224 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

■ साक्षी, विनेशने कुस्ती सोडली!
■ बॉलिवूडमध्ये डेब्यू करणार निसा?
■ लोकसभेत निलंबन सत्र सुरूच!
■ मुख्यमंत्र्यांकडून यंत्रणेचा आढावा

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 22 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महापालिका आयुक्तांची ‘राजकीय कोंडी’!

## » विविध प्रकल्पांना राजकारणाचा फटका : प्रशासकीय कारभारत हाकताना डोकेदुखी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील बदललेली राजकीय परिस्थिती, शहरातील स्थानिक नेत्यांमधील ‘त्रिशंकू’ वातावरण आणि अधिकाऱ्यांची वाढलेली असुरक्षितता यामुळे महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची चांगलीच राजकीय कोंडी झाली आहे. प्रशासक म्हणून सर्वाधिकार असतानाही कारकिर्दीतील ‘बॅड पॅच’ सुरू असलेल्या मानसिकतेत आयुक्त आहेत, अशी चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेत दि. १२ मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट सुरू झाली. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात शहरातील स्थानिक भाजपाच्या नेत्यांचा रोष तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांना घ्यावा लागला. कारण, त्यांनी भाजपा प्रस्तावित कामांना स्थगिती आणि चौकशीच्या ससेमिऱ्यामध्ये अडकले होते. त्यानंतर राज्यात सत्ता परिवर्तन झाले. महायुतीची सत्ता स्थापन झाली. त्यावेळी शहरातील निर्णय प्रक्रियेमध्ये भाजपा आणि शिवसेना पक्षाचे स्थानिक नेते सहभागी झाले.

राज्यातील सत्ता परिवर्तनानंतर महापालिका आयुक्तपदीही बदल झाला. शेखर सिंह यांची आयुक्तपदी वर्णी लागली. अत्यंत उच्च विद्याविभूषित असलेले सनदी अधिकारी शेखरसिंह यांनी महापालिकेतील प्रशासकीय कामकाजाची सूत्रे हाती घेतली. शहरातील राजकीय दबावाला न जुमानता त्यांनी केबल डक्टींग, भामा आसखेड जॅकवेल प्रकल्प असे अनेक विषय प्रशासकीय अधिकारामध्ये मार्गी लावले.‘ IN LARGE PUBLIC INTEREST’ असा दावा करीत शेखर सिंह अनेक ‘बाहुबली’ नेत्यांना डोईजड झाले होते.

प्रशासक म्हूणन लोकहिताचे निर्णय घेताना शेखर सिंह यांना अनेकांचा विरोध पत्करावा लागला. पुनावळे कचरा डेपो, मोशी हॉर्स रायडिंग प्रकल्प , उपयोगकर्ता शुल्क, मोशीतील कचरा संकलन केंद्र, अतिक्रमण कारवाई यासह अनेक विषयांमध्ये शेखर सिंह यांना स्थानिक नेते, पदाधिकारी आणि नागरिकांच्या विरोधामुळे माघार घ्यावी लागली.

विशेष म्हणजे, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये शहरातील विविध विषयांवर घमासान चर्चा झाली. उपयोगकर्ता शुल्क वसुलीला स्थगिती मिळाली. इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प, सीसीटीव्ही कॅमेरा भ्रष्टाचार, वाकड येथील जागेचा टीडीआर, तळवडे येथील आग दुर्घटना, प्राणी संग्रहालय आदी विषयांवर सभागृहात चर्चेत आले.

टीडीआर प्रकरणामुळे आयुक्तांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले. महापालिका प्रशासनावर आरोप झाले. त्यामुळे आयुक्तांसह प्रमुख अधिकारी नागपूरमध्ये दाखल झाले होते. त्यामुळे सत्ताधारी नेते, मंत्री आणि सभागृहाला खुलासे करताना आयुक्तांसह अधिकाऱ्यांची दमछाक झाली. नागपूरची गुलाबी थंडी आयुक्तांना मात्र ‘बोचरी’ ठरली.

### त्रिशंकू राजकीय परिस्थितीचा फटका...

» महायुतीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गट सहभागी झाला. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पुण्याचे पालकमंत्री करण्यात आले. त्यामुळे महापालिकेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट, उपमुख्यमंत्री अजित पवार गट आणि भारतीय जनता पार्टीचे स्थानिक नेते अशी ‘त्रिशंकू’ परिस्थिती निर्माण झाली. परिणामी, शेखर सिंह यांना कोणताही निर्णय घेताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे.

### विकासकामांच्या अनेक फाईल्स प्रलंबित...

**» आयुक्त शेखर सिंह यांची क्षमता असतानाही राजकीय ‘सॅंडविच’मुळे अनेक विकासकामांच्या फाईल्स प्रलंबित आहेत. तीन अतिरिक् आयुक्त, मुख्य शहर अभियंता, दोन मुख्य अभियंता, प्रत्येक विभागाचे सहायक आयुक्त असा लवाजमा दिमतीला असूनही, अनेक विकासकामांच्या फाईल पडून आहेत. त्यामुळे महापालिका कारभारामध्ये कमालीची उदासीनता आणि नकारात्मकता आली आहे. ही स्थिती शहराच्या विकासकामांवर विपरित परिणाम करणारी आहे.**

# पिंपरी-चिंचवड पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

## » 2 कोटी 42 लाखाचा मुद्देमाल फिर्यादींना परत : विनयकुमार चौबे यांची उपस्थिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड पोलिसांनी गहाळ आणि चोरी झालेला २ कोटी ४२ लाख ५९ हजार ३६१ रुपये किमतीचा मुद्देमाल मूळ मालकाला परत केला आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी केलेली ही सर्वात मोठी कामगिरी आहे. यात २१ लाखांचे ४८ तोळे सोन्याचे दागिने, २५ लाखांची दोन महागड्या चारचाकी, ८ लाखांच्या २२ दुचाकी, १४ लाख ८८ हजारांचे ६९ वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल असा एकूण दोन कोटींचा मुद्देमाल मूळ मालकांना परत केला आहे. पिंपरी- चिंचवड पोलिसांनी १२५ वेगवेगळ्या गुन्ह्यातील चोरी गेलेले मोबाईल, दुचाकी, चारचाकी, सोन्याचे दागिने, लॅपटॉप हे मूळ मालकांना परत केले आहेत. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते मूळ मालकांना मुद्देमाल देण्यात आला.**



पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांचे संकल्पनेतून हा कार्यक्रम पिंपरी चिंचवड पोलीस मुख्यालय येथे पार पडला. यावेळी एकुण १२५ वेगवेगळ्या गुन्ह्यांतील फिर्यादींना त्यांचा मुद्देमाल परत करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी विनयकुमार चोबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, संजय शिंदे, सह पोलीस आयुक्त, वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त व श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, विवेक पाटील, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, काकासाहेब डोळे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, संदीप डोईफोडे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३, सतीश माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, बाळासाहेब कोपनर, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे -१ व विवेक मुगळीकर, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, विठ्ठल कुबडे, सहायक पोलीस आयुक्त, एमआयडीसी भोसरी विभाग, विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, वाकड विभाग, अनिल कोळी, सहायक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग हे उपस्थित होते.

### फिर्यादींनी मानले पोलिसांचे आभार...

»या कार्यक्रमाची प्रस्तावना अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांनी केली. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी या प्रसंगी फिर्यादींना उद्देशून तुमच्या चेह-यावरचा आनंद पाहून पोलीस अधिकारी म्हणून आम्हाला आमच्या कामाची पावती मिळाली. तसेच यापुढे देखील असे कार्यक्रम वेळोवेळी आयोजित केले जातील जेणे करुन जनतेचे मनोबल वाढेल व अधिकाधिक फिर्यादी पुढे होवनु पोलीसांकडे आपल्या तक्रारी दाखल करतील असे मनोगत व्यक्त केले.

# काही कोटी लोकांना कुणबी प्रमाणपत्र मिळेल

## मराठा आरक्षणाबाबत चंद्रकांत पाटील यांचे भाष्य

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिली. त्यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य केले. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे या वेळी उपस्थित होते. मनोज जरांगे पाटील यांनी दिलेली मुदत संपली आहे. विधीमंडळाचे अधिवेशनही संपले आहे.**



अधिवेशनात मराठा आरक्षणाबाबत काय चर्चा झाली असा प्रश्न माध्यमांकडून विचारण्यात आला. त्याला उत्तर देताना पाटील म्हणाले, की की मनोज जरांगे पाटील आणि सरकारमधील संवाद उत्तम सुरू आहे. जरांगे यांनी मांडलेल्या बहुतांश मागण्या पूर्ण होत चालल्या आहेत. कुणबी प्रमाणपत्र मिळत नाही म्हणून जरांगे यांच्या उपोषणाची सुरुवात झाली. स्वतःचे कुणबी प्रमाणपत्र, मग कुणबी नोंदी असलेल्यांना प्रमाणपत्र आणि आता सरसकट कुणबी प्रमाणपत्र अशा त्यांच्या मागण्यांचा प्रवास राहिला आहे. कुणबी नोंदी असलेल्यांना प्रमाणपत्र मिळत नाही असे त्यांचे जे मत आहे, त्याबाबत त्यांचे आता बरेच समाधान झाले आहे, असे माझे मत आहे. आतापर्यंत काही लाख नोंदी सापडल्या आहेत. पण या नोंदी काही लपवून ठेवलेल्या नव्हत्या. साधारणपणे वैयक्तिक मागणी केल्यावर असे प्रमाणपत्र मिळते, पण समाज म्हणून प्रमाणपत्र मिळण्याची मागणी झाल्यावर सरकारने समिती नेमली. त्यामुळे आता काही कोटी लोकांना कुणबी प्रमाणपत्र मिळेल. म्हणून जरांगे पाटील समाधानी आहेत, असे पाटील म्हणाले. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिली. त्यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य केले. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे या वेळी उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाने पुण्यातील आमदारांचे रिपोर्ट कार्ड मागवले आहे. त्यामुळे आमदार धास्तावल्याची चर्चा पुण्यातील राजकीय वर्तुळात आहे. या बाबत विचारले असता पाटील म्हणाले, की ग्रामपंचायत सदस्यापासून खासदारापर्यंत सर्वांचीच कामगिरी पक्षाकडून तपासली जात असते. अन्य पक्षांप्रमाणे निवडणुकीपुरती कामे न होता पूर्ण कार्यकाळ लोकांसाठी दिला जावा अशी पक्षाची भूमिका आहे. त्यामुळे केवळ पुण्यातच नाही, तर सगळीकडूनच कामगिरीचा अहवाल घेऊन तपासला जातो. खासदारांच्या निलंबनाचे पडसाद लोकसभा निवडणुकीत दिसतील असे पवार म्हणत असल्याच्या या प्रश्नावर पाटील म्हणाले, की आशावादी राहणे माणसाला दिलेला नैसर्गिक गुण आहे. तसाच तो पवारांमध्येही आहे. भाजपचे नेते आणि उच्च तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर गेल्या काही महिन्यात दोन वेळा शाई फेकीच्या घटना घडल्या होत्या. या दोन्ही घटनेनंतर ज्या ठिकाणी चंद्रकांत पाटील कार्यक्रमास जातात त्या ठिकाणी अधिकचा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येत असतो, ज्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये. आज फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक महोत्सवाला चंद्रकांत पाटील यांनी भेट दिली. त्यानंतर त्यांनी पत्रकाराशी संवाद साधत अनेक राजकीय घडामोडींबाबत भूमिका देखील मांडली. दरम्यान अंबेजोगाई येथील ३५ वर्षीय शिवराज मोहन ठाकूर या तरुणाने चंद्रकांत पाटील यांना स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांबाबत प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात तू कोण आहेस, पत्रकार नसशील तर बाजूला होण्यास चंद्रकांत पाटील यांनी सांगितले, संबंधित तरुणाची पोलिसांना चौकशी करण्यास सांगितले. पण या प्रकारामुळे चंद्रकांत पाटील यांचे प्रतिक्रिया देतांना लक्ष काहीसे विचलित झाल्याचे पहायला मिळाले.

### पत्रकार नसशील तर बाजूला हो

पत्रकाराशी संवाद साधत अनेक राजकीय घडामोडींबाबत भूमिका देखील मांडली. दरम्यान अंबेजोगाई येथील ३५ वर्षीय शिवराज मोहन ठाकूर या तरुणाने चंद्रकांत पाटील यांना स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांबाबत प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात तू कोण आहेस, पत्रकार नसशील तर बाजूला होण्यास चंद्रकांत पाटील यांनी सांगितले, संबंधित तरुणाची पोलिसांना चौकशी करण्यास सांगितले. पण या प्रकारामुळे चंद्रकांत पाटील यांचे प्रतिक्रिया देतांना लक्ष काहीसे विचलित झाल्याचे पहायला मिळाले. त्यानंतर चंद्रकांत पाटील हे पुढील कार्यक्रमासाठी मार्गस्थ झाले. पोलिसांनी त्या तरुणाची चौकशी करुन त्याला नंतर सोडून दिले.

# पाच रुपयांचे दूध अनुदान अडकणार नियमांच्या चौकटीत

## खासगी संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान नाही

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दूधदराची कोंडी फोडण्यासाठी राज्य सरकारने, सहकारी दूध संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्याची घोषणा केली आहे. पण, हे पाच रुपयांचे अनुदान सरकारी निकषाच्या चौकटीतच अडकून पडण्याची भीती आहे. शिवाय खासगी दूध संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना हे अनुदान मिळणार नाही, त्यामुळे हे अनुदान शेतकऱ्यांसाठी एक मृगजळ ठरणार आहे.**



राज्यभरातील विविध शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे राज्य सरकारने हिवाळी अधिवेशनात गायीच्या दुधाला प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला. मात्र, हे अनुदान नियमांच्या चौकटीतच अडकून पडण्याची शक्यता आहे. संबंधित शेतकऱ्याने सहकारी दूध संघाला दूध घातले पाहिजे. त्या संघाने २९ रुपये प्रति लिटर दर दिला तरच राज्य सरकारकडून पाच रुपये मिळणार आहेत. पाच रुपये मिळण्यासाठी सहकारी दूध संघाने दूध बील शेतकऱ्याच्या बँक खात्यात ऑनलाइन पद्धतीने जमा करणे गरजेचे आहे तसेच शेतकऱ्याचा आधार कार्ड आणि गायीचे एअर टॅगिंग म्हणजे गाईचे आधारकार्ड यांची ऑनलाइन जोडणी झालेली असणे गरजेचे आहे. तरच हे पाच रुपयांचे अनुदान मिळणार आहे. सरकारने ही घोषणा करताना सहकारी दूध संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांनाच लागू केली आहे. खासगी दूध संघाने दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना ही योजना लागू असणार नाही. त्यामुळे खासगी संघाना दूध पुरविणारे शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार आहेत. राज्यात संकलित होत असलेल्या एकूण दुधापैकी ७२ टक्के दुध खासगी दूध संघामध्ये संकलित होते. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील दुधापैकी ७२ टक्के दूध उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होणार आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांमध्ये असा अन्याय न करता राज्यातील सर्व दुध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर पाच रुपये अनुदान द्यावे व राज्यात ३.२/८.३ गुण प्रतिच्या दुधाला किमान ३४ रुपये दर मिळेल यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलावीत, अशी मागणी किसान सभा व दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केली आहे.

> सहकारी दुध संघाना दूध पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति लिटर पाच रुपयांचे अनुदान देतानाही सरकारने नेहेमीप्रमाणे अटी शर्तींचे अडथळे निर्माण केले आहेत. प्रामुख्याने जास्त दुध संकट असणाऱ्या अहमदनगर, पुणे, संभाजीनगर, सोलापूर, नाशिक जिल्ह्यामध्ये सहकारी दूधसंघ दुधाला सरासरी २६ ते २७ रुपये दर देतात. ते संघ आहे. असे संघ २९रुपये दर देऊ शकतील का हा मुख्य प्रश्न आहे. अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी शेतकऱ्यांच्या गायीचे पशु जनगणने अंतर्गत एअर टॅगिंग झालेले असले पाहिजे व ते शेतकऱ्यांच्या आधार कार्डशी लिंक असणे आवश्यक आहे, अशी जोडणी न झालेल्या गायींच्या दुधाला अनुदानापासून वंचित राहावे लागणार आहे.
>
> **– डॉ. अजित नवले,** सरचिटणीस किसान सभा

# तळेगाव-शिक्रापूर मार्ग होणार 'कोंडीमुक्त'!

## उन्नत मार्गाला लवकरच मिळणार केंद्राची मंजुरी : खासदार श्रीरंग बारणे यांचा पाठपुरावा

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची गर्दी असते. अशीच परिस्थिती देहूरोड सेंट्रल चौक ते चांदणी चौक दरम्यान देखील असते. या मार्गांवरील कोंडी कमी करण्यासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत आहेत. त्यांच्या पाठपुराव्याला यश येत असून तळेगाव-चाकण-शिक्रापूर दरम्यान उन्नत मार्गाला केंद्राकडून लवकरच मंजुरी मिळणार आहे. याबाबत स्वतः केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत माहिती दिली आहे.**



संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. त्यात गुरुवारी (दि. २१) मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दोन महत्वाच्या रस्त्यांबाबत प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न उपस्थित केला. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ पासून तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ पासून देहूरोड सेंट्रल चौक-किवळे-वाकड-चांदणी चौक मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ ला जोडणाऱ्या मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार झाला आहे. मात्र अद्याप या मार्गाचे काम सुरु झालेले नाही.

यामुळे तळेगाव, चाकण, शिक्रापूर, पिंपरी-चिंचवड एमआयडीसी येथे जाणारी अवजड वाहने, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वरून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ कडे (मुंबई-बेंगलोर महामार्ग) जाणारी वाहने वाहतूक कोंडीत अडकून पडतात. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी या दोन्ही मार्गावरील कामाला मंजुरी कधी मिळेल आणि काम कधीपर्यंत सुरु होईल, असे बारणे यांनी आपल्या प्रश्नात म्हटले.

> पुणे-अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर या मार्गावर नवीन द्रुतगती मार्ग बनवला जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने बनवलेल्या कार्पोरेशनला बीओटी तत्वावर या रस्त्याचे काम देण्याबाबत विचार सुरु आहे. याच दरम्यान तळेगाव-चाकण-शिक्रापूर दरम्यानचा देखील उन्नत मार्ग बनवला जाणार आहे. त्याला लवकरच मंजुरी दिली जाईल.
>
> **-नितीन गडकरी,** केंद्रीय मंत्री.

काय म्हणाले नितीन गडकरी?

खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रश्नाला केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी उत्तर दिले. नितीन गडकरी म्हणाले, पुणे-मुंबई मार्गासह तळेगाव-चाकण-शिक्रापूर या मार्गांवर मोठ्या प्रमाणात रस्ते वाहतूक होते.

या भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहती आहेत. या भागातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी केंद्र सरकार काम करत आहे. तळेगाव-चाकण-शिक्रापूर या दरम्यान उड्डाणपुल बांधला जाणार आहे. त्याचे डिझाईन बनवण्यात आले असून त्याचा डीपीआर देखील तयार झाला आहे. तो डीपीआर दिल्ली येथे मंजुरीसाठी आला आहे. त्याला लवकरच मंजुरी दिली जाणार आहे.

---

# तृणमूल कॉंग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांचा निषेध !

## पिंपरीत भाजपाचे आंदोलन : संसदेत उपराष्ट्रपती यांची नक्कल केल्याचे तीव्र पडसाद

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**तृणमूल कॉंग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्या निषेधार्थ पिंपरीत भाजपच्यावतीने आंदोलन करण्यात आले. लोकशाहीचे मंदिर असणाऱ्या संसद भवनामध्ये तृणमूल कॉंग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी भारताचे उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे सभापती जगदीपजी धनखड यांची नक्कल केली. या घटनेचे कॉंग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी चित्रण करून हास्य उडविले. या घटनेचा निषेध म्हणून भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार आणि भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) अध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आज, दि. २१ रोजी सकाळी कॉंग्रेस आणि त्यांच्या समविचारी पक्षांनी केलेल्या या कृतीच्या विरोधात 'निषेध आंदोलन' पार पडले.**




**कॉंग्रेसचे अशोभनीय वर्तन...; उपराष्ट्रपती आणि संविधानाचा अपमान आम्ही खपवून घेणार नाही**

यावेळी, भाजपा वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस नामदेव ढाके, शैला मोळक, नगरसेवक माउली थोरात, मोरेश्वर शेडगे, सुरेश भोईर, प्रसाद कस्पटे, संदीप नखाते, शिवराम पाटील, वैशाली खाडये, रविंद्र नांदुरकर, निलेश अष्टेकर, मधुकर बच्चे, प्रदीपकुमार बेंद्रे, रविंद्र देशपांडे, दिपक भंडारी, आकाश भारती, सचिन काळभोर, गणेश संभेराव, नंदू कदम, संजय बढे, देवराम महाजन, प्रताप सोलंकी, राकेश सिंग ठाकूर, प्रिती कामतीकर, सीमा चव्हाण, प्रज्ञा हितनाळीकर, कैलास सानप, निता कुशारे, पल्लवी मारकड, अलका मकवाना, जयश्री मकवाना, जयश्री काशीद, राजश्री शाह, शाकीर शेख, जयश्री वाघमारे, रफीक खान, गणेश ढाकणे, अजित कुलथे, संजय परळीकर, साहिल जगताप यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, शक्ती केंद्र प्रमुख, बूथ प्रमुख, वॉरियर्स, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. प्रसंगी, संवैधानिक पदाचा अवमान करणा-या खासदारांविरोधात घोषणाबाजी करून निषेध नोंदविण्यात आला.

> » लोकशाहीचे मंदिर संसद भवनात तृणमूल कॉंग्रसचे खासदार कल्याण बॅनर्जी हे भारताचे उपराष्ट्रपती व राज्यसभा सभापती जगदीप धनखड यांच्या (व्यंगत्वावर) अवमान करणारे असभ्य व अशोभनीय वर्तन करत होते. राहुल गांधी हे त्यांचे चित्रण करत होते. कॉंग्रेसने देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची खिल्ली उडवली. याचा हिशेब आगामी लोकसभा निवडणुकीत नक्कीच चुकता करावा लागेल. 'उपराष्ट्रपतींच्या मिमिक्रीचा आम्ही तीव्र निषेध करतो. विरोधक सर्व मर्यादा ओलांडत आहेत.
>
> घटनात्मक पदावर असलेल्या लोकांचा ते सातत्याने अपमान करत आहेत. राष्ट्रपती दलित महिला असल्याने विरोधकांनी त्यांचा अपमान केला होता. उपराष्ट्रपती पदाचाही विरोधकांनी अवमान केला. उपराष्ट्रपती आणि संविधानाचा अपमान आम्ही खपवून घेणार नाही. भारत उपराष्ट्रपतींचा अपमान सहन करणार नाही. राहूल गांधी आणि तृणमूल कॉंग्रेस खासदार कल्याण बॅनर्जी यांनी उपराष्ट्रपती धनखड यांची व देशवासियांची माफी मागावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.




# आदिवासींना सवलती नाकारणे घटनाविरोधी!

**आदिवासींना प्रलोभने दाखवून त्यांचे धर्मांतर केले जात आहे. अशा धर्मांतरित आदिवासींना अनुसूचित जमातींना मिळणाऱ्या सवलती देऊ नयेत, अशी लक्षवेधी सूचना भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांनी १४ डिसेंबर रोजी विधान परिषदेत मांडली.**

त्यावर उत्तर देताना कौशल्य आणि रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी धर्मांतरीत व्यक्तींना आदिवासींचे लाभ घेता येतील, का याविषयी अभ्यास करण्यासाठी समिती नेमण्यात येणार असल्याचे सांगितले. आणि लगोलग १८ डिसेंबर २०२३ रोजी या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार विभागाने शासन निर्णय काढला. ज्या वेगाने ही सर्व प्रक्रिया पार पाडण्यात आली, तो अतिशय लक्षणीय आहे. ही सर्व घाई एका विशिष्ट राजकीय पक्षाने व धार्मिक गटाने केलेल्या आग्रहाचा परिणाम असल्याचा आणि यामागे इतर धर्मांना लक्ष्य करण्याचा द्वेषपूर्ण उद्देश असल्याचा संशय येतो. सरकार उचलू पाहत असलेले हे पाऊल भारतीय घटनेतील तरतुदींशी विसंगत तर आहेच पण त्यासोबतच व्यक्तिस्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणणारेदेखील आहे. मुळात भारताच्या राज्यघटनेच्या अनुच्छेद १५ आणि १६ द्वारे आदिवासींसाठी केलेल्या विशेष सवलतींची आणि आरक्षणाची व्यवस्था ही धर्माच्या आधारावर करण्यात आलेली



नसून आदिवासींना या सवलती 'आदिवासी' म्हणूनच मिळालेल्या आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद – ३६६ (२५) मध्ये असलेल्या अनुसूचित जमातीच्या व्याख्येनुसार अनुच्छेद ३४२ अन्वये 'ज्यांना अनुसूचित जमाती असल्याचे मानले गेले आहे, त्यांचा समावेश हा आदिवासी म्हणून करण्यात येईल. राज्यघटनेच्या अनुच्छेद ३४२ चा वापर करून राष्ट्रपतीला कोणत्याही राज्याच्या वा केंद्रशासित प्रदेशाच्या राज्यपाल अथवा राज्यप्रमुखाशी विचारविनिमय केल्यानंतर, जाहीर अधिसूचनेद्वारे त्या राज्याच्या संदर्भात व संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जनजाती मानल्या जातील त्या जनजाती किंवा जनजातीसमुदाय अथवा जमाती किंवा जनजातीसमुदायांचे भाग किंवा समूह विनिर्दिष्ट करता येतील.' या अनुच्छेदाद्वारे मिळालेल्या अधिकाराचा वापर करून माननीय राष्ट्रपतींनी, संविधान (अनुसुचित जमाती) आदेश, १९५० काढला. त्यामध्ये विविध राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांतील 'अनुसूचित जमाती'मध्ये मोडणाऱ्या जमातींची यादी आहे. आजवर संसदेने या आदेशातील यादीमध्ये अनेकदा दुरुस्त्यादेखील केल्या. कुठल्याही जमातीचा अनुसूचित जमातीत समावेश करताना (१) प्राचीन जीवनमान (२) सांस्कृतिक भिन्नता (३) भौगोलिक अलितप्ता (४) मोठ्या प्रमाणावर बाह्य समुदायाशी संपर्क साधण्यातील लाजरेपणा (५) सामाजिक मागासलेपण हे निकष लावले गेले. हे निकष ब्रिटिशकालीन जनगणना आणि स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेल्या केळकर समिती (१९५५), लोकूर समिती (१९६५), चंदा समिती (१९६९) यांनी अभ्यासानंतर सुचवल्यानुसार ठरवण्यात आले होते. आदिवासी जमाती ठरताना सर्व निकषांचा आणि कुठल्याही धर्माचा तिळमात्र संबंध येत नसून धर्म ही संकल्पना पूर्णपणे वैयक्तिक व मूलभूत अधिकारांशी संबंधित आहे. १९४१च्या जनगणनेपर्यंत स्वतंत्र आदिवासी म्हणून ओळखला गेलेला हा आदिवासी समाज स्वातंत्र्यानंतर अनुसुचित जनजाती म्हणून ओळखला जाऊ लागला. परंतु, १९५१ च्या जनगणनेपासून सरकारने आदिवासींसाठी वेगळा धर्मकोड उपलब्ध करून न दिल्याने अंदमानचा आदिवासी असो अथवा महाराष्ट्राच्या सातपुड्याच्या जंगलातील आदिवासी असो, ते कोणत्याही धर्मात मोडत नव्हते. पुढे आदिवासींच्या अशिक्षितपणामुळे ते हिंदू किंवा इतर कुठल्यातरी धर्मांत मोडत असल्याचे दाखवले गेले. आदिवासी वर्षानुवर्षे जंगलात राहून बाह्य जगापासून अलिप्त होते, ज्यांच्या चालीरीती, रूढी परंपरा, बोली भाषा व संस्कृती इतर धर्मांपेक्षा पूर्णपणे वेगळ्या होत्या आणि आताही आहेत. त्यांना त्यांच्या सहमतीशिवाय हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन किंवा इतर धर्मांत समाविष्ट करण्यात आले आणि आता डीलिस्टींगच्या नावाने त्यांना बोगस आदिवासी ठरवून त्यांच्यासाठी असलेल्या घटनात्मक तरतुदी, सवलती व आरक्षणापासून वंचित ठेवण्याच्या दृष्टीने सरकारकडून प्रयत्न होत आहेत.

## संपादकीय »

### विनोद यांची 'राय'!

***जवळपास शंभराहून अधिक वर्षांचे जुने दूरसंचार कायदे बदलून त्या जागी नवा, सर्वसमावेशक दूरसंचार कायदा आणण्याच्या नरेंद्र मोदी सरकारच्या प्रयत्नांचे स्वागत.***

जवळपास शंभराहून अधिक वर्षांचे जुने दूरसंचार कायदे बदलून त्या जागी नवा, सर्वसमावेशक दूरसंचार कायदा आणण्याच्या नरेंद्र मोदी सरकारच्या प्रयत्नांचे स्वागत. या कायद्याचा प्रस्ताव आणि जवळपास ५६ पानांचे परिशिष्ट नुकतेच संसदेत सादर झाले. या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यात आणखी काही काळ जाईल. सध्या ज्या पद्धतीने विरोधी पक्षीय खासदार निलंबित होत आहेत ते पाहता यावर कोणतीही साधक-बाधक चर्चा न होता सदर विधेयकाचे रूपांतर झटपट कायद्यात होईलही. त्यांच्या जागी स्वतंत्र, नवाकोरा दूरसंचार कायदा अस्तित्वात येईल. त्याची गरज होतीच, कारण दूरसंचार हे वैद्यकाप्रमाणे झपाट्याने बदलणारे क्षेत्र आहे. या नव्या युगाच्या क्षेत्राचे नियमन करणारे कायदेही नवीन हवेत. हे कायदे रचले गेले तेव्हा हे क्षेत्र पूर्णत: सरकार नियंत्रित होते.

**केंद्रीय महिला व बालविकास मंत्री स्मृती इराणी यांनी संसदेत मासिक पाळीदरम्यान रजा देण्याबाबत मांडलेल्या भूमिकेनंतर या मुद्द्यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. मासिक पाळीच्या काळात स्त्रियांना रजा दिली जावी की नाही या मुद्द्यावर आता राष्ट्रीय पातळीवर चर्चा सुरू झाली आहे.**

# स्त्रियांना मासिक पाळीत रजा मिळावी का?

नुकतेच केंद्रीय महिला व बालविकास मंत्री स्मृती इराणी यांनी संसदेत यासंदर्भातील मनोज झा यांच्या एका पूरक प्रश्नाला उत्तर देताना केलेल्या भाष्यामुळे त्यावरीच चर्चा अधिक टोकदार होऊ लागली आहे. स्त्रियांना मासिक पाळीत होणाऱ्या त्रासाचा विचार करून सरकार त्यांना या काळात पगारी रजा देण्याबाबत काय विचार करत आहे, असा प्रश्न मनोज झा यांनी राज्यसभेत विचारला होता. त्यावर केंद्रीय महिला व बालविकास मंत्री स्मृती इराणी यांनी मासिक पाळी म्हणजे अपंगत्व नाही, असे म्हणत या दरम्यान रजा दिली जाऊ नये असे अप्रत्यक्षपणे सुचवले आहे. कारण त्यामुळे शारीरिक कारण देत महिलांना संधी नाकारली जाऊ शकते, असे मंत्री महोदयांना वाटते. वास्तविक या प्रश्नाला वेगवेगळे पैलू आहेत. मासिक पाळीदरम्यान प्रत्येक स्त्रीला सगळे चारही दिवस त्रास होतोच असे नाही, तसेच सरसकट सगळ्याच स्त्रियांना त्रास होतच नाही, असेही




म्हणता येत नाही. काही स्त्रियांना मासिक पाळीदरम्यान चारही दिवस त्रास होतो आणि तो आयुष्यभर होतो. काही स्त्रियांना तो चारपैकी एकदोन दिवसच होतो तर काही स्त्रियांच्या बाबतीत तो बाळंतपणानंतर नाहीसा होतो. आहार, योगसाधना, काही औषधे यांच्या माध्यमातून काही स्त्रियांना त्या त्रासावर नियंत्रण आणता येते, पण तसे सरसकट प्रत्येक स्त्रीच्या बाबतीत होतेच असे नाही. पन्नाससाठ वर्षांपूर्वी आपल्याच समाजात मासिक पाळीदरम्यान स्त्रियांना 'बाजूला' बसवले जायचे. त्यांचा स्पर्श हा 'विटाळ' मानला जायचा. त्या चार दिवसांदरम्यान त्यांना अपवित्र मानले जायचे. या चार दिवसांदरम्यान त्यांना विश्रांती गरजेची असते असे म्हटले जायचे, पण प्रत्यक्षात त्यांच्याकडून धान्य निवडणे, शिवणटिपण वगैरे जास्तीची कामे करून घेतली जायची. स्त्रिया घरीच असत, नोकरीव्यवसाय करत नसत तेव्हा हे सगळे चालूनही गेले. पण त्या शिक्षणासाठी, अर्थार्जनासाठी घराबाहेर पडल्या, तसे हळूहळू हे 'बाजूला बसणे' बऱ्याच ठिकाणी बंद होत गेले. मासिक पाळीबद्दलचा टॅबू कमी होऊन त्याबद्दल, त्यात होणाऱ्या त्रासाबद्दल मोकळेपणाने बोलले जाणे हा गेल्या पाचदहा वर्षांमधला बदल. या काळात होणाऱ्या रक्तस्त्रावामुळे, होणाऱ्या हार्मोनल बदलांमुळे स्त्रीची शारीरिक आणि मानसिक अवस्था नाजूक असते. काहीजणींना या काळात थकवा, पायात गोळे येणे, पोट दुखणे, अंग दुखणे आणि इतर प्रकारचे त्रास खरोखर होतात. काही जणींबाबत ते अनुवांशिक स्वरुपाचे असतात तर काहींना त्यांचे एरवीचे राहणीमान, खाणेपिणे, रोजची दगदग यांच्याशी ते संबंधित असतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुख्यमंत्र्यांकडून आरोग्य यंत्रणेचा आढावा

## घाबरू नका, काळजी घ्या, एकनाथ शिंदेंकडून आवाहन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशात आणि राज्यात सध्या जेएन-वन हा करोनाचा नवा व्हेरिएंट आढळून आला आहे. यापार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आरोग्य यंत्रणा तसेच जिल्हाधिकारी यांची बैठक घेतली. राज्यभरातील आरोग्य संस्थांचे स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीक आणि फायर ऑडीट करण्यात यावे. त्याचबरोबर रुग्णालयांमध्ये विलगीकरण आणि ऑक्सिजन बेडस् यांची यंत्रणा सज्ज ठेवावी. नागरिकांनी घाबरून न जाता करोना प्रतिबंधात्मक सूचनांचे पालन करावे, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं.**



मुख्यमंत्र्यांनी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून ही बैठक घेतली. त्यामध्ये आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव विकास खारगे, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर संबंधित विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते. देशात आणि राज्यात सध्या जेएन-वन (JN1) हा कोरोनाचा नवा व्हेरिएंट आढळून आला आहे. यापार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आरोग्य यंत्रणा तसेच जिल्हाधिकारी यांची बैठक घेतली. राज्यभरातील आरोग्य संस्थांचे स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीक आणि फायर ऑडीट करण्यात यावे. त्याचबरोबर रुग्णालयांमध्ये विलगीकरण आणि ऑक्सिजन बेडस् यांची यंत्रणा सज्ज ठेवावी. नागरिकांनी घाबरून न जाता कोरोना प्रतिबंधात्मक सूचनांचे पालन करावे, राज्यभरातील यंत्रणा सज्ज असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून बैठक घेतली. त्यामध्ये आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव विकास खारगे, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर संबंधित विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते. ऑक्सिजन प्लांट्स, व्हेंटिलेटर, ऑक्सिजन पाईपलाईन्स, आरटीपीसीआर लॅब, डयुरा/लिक्विड ऑक्सिजन प्लांट या सर्व बाबी सुस्थितीत आहेत का याची तपासणी करावी व योग्य पद्धतीने ते कार्यान्वित आहेत की नाही याची खात्री करतानाच लसीकरणाचा आढावा घ्यावा, ज्यांचे लसीकरण झालेले नाही त्यांची माहिती घ्यावी व लसीकरण करण्याच्या दृष्टीने तयारी ठेवावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. लस व औषध साठा पुरेसा उपलब्ध असल्याची खात्री करून घ्यावी. आरोग्य यंत्रणेने टास्क फोर्सची स्थापना करुन त्यातील तज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे असे सांगत मुख्यमंत्र्यांनी कोविड सेंटर, विलगीकरण बेड्स, आयसीयू बेड्स, व्हेंटिलेटर बेड्स च्या सद्यःस्थितीबाबतचीही माहिती यावेळी घेतली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशाने याआधी देखील कोविडच्या संकटाचा धीरोदात्तपणे यशस्वी मुकाबला केला आहे. संपूर्ण जगाने त्याबाबतीत आपल्या देशाचे अनुकरण केले.

### राज्यात 63 हजार विलगीकरण बेड्स

मागील अनुभवाच्या आधारे आताही राज्यातील यंत्रणा संपूर्णपणे सज्ज आहे. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही. नागरिकांनी सर्दी, खोकला, ताप यासारखी लक्षणे दिसल्यास त्यांनी तात्काळ तपासणी करुन घ्यावी. आगामी सण व नववर्षाचे स्वागत या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी जाताना मास्क् वापरावा. आपल्यामुळे इतरांना संसर्ग होणार यासाठी काळजी घेण्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी नागरिकांना केले. सोशल मीडियावरून तसेच प्रसारमाध्यमांनी देखील या नव्या व्हेरिएंट संदर्भात चुकीच्या बातम्या प्रसारित होणार नाहीत याची दक्षता घेणे जेणेकरून लोकांमध्ये संभ्रम वा घबराट निर्माण होणार नाही, अफवा पसरणार नाही. माहिती प्रसारीत करताना अधिकृत माहितीचाच उपयोग करावा, यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. शासन यंत्रणा एकजुटीने कोणत्याही परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी पूर्णतः सज्ज आहे. यंत्रसामुग्री, औषध साठा, इतर साधनसामुग्री मुबलक प्रमाणात उपलब्ध् आहे. त्यामुळे जनतेने घाबरु नये. काळजी घ्यावी काळजी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. सध्या राज्यात 63 हजार विलगीकरण बेड्स, 33 हजार ऑक्सिजन बेड्स, ९ हजार ५०० आयसीयू बेड्स व सहा हजार व्हेंटिलेटर बेड्स उपलब्ध आहेत. सध्या राज्यात कोरोनाचे ४५ रुग्ण (मुंबई 27, पुणे-8, ठाणे-8,कोल्हापूर-1 रायगड-1) आढळून आले आहेत, असे म्हैसकर यांनी यावेळी सांगितले.लस व औषध साठा पुरेसा उपलब्ध असल्याची खात्री करून घ्यावी. आरोग्य यंत्रणेने टास्क फोर्सची स्थापना करुन त्यातील तज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे.

# नरेंद्र मोदींच्या रुपात देशात तानाशाही चाललीय!

## अयोध्येच्या श्रीराम मंदिराच्या उद्घाटनाचे निमंत्रण देणारे भाजपवाले कोण?

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्या प्रमाणे लोकशाहीच्या मार्गानं खासदार आपल्या जागेवर उभे राहून जनतेचे प्रश्न उपस्थित करीत असतांना तुम्ही त्यांना निलंबित करता? असा प्रश्न विचारत कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले (NANA PATOLE) यांनी भाजपवर अनेक मुद्यावरुन टिकास्त्र सोडले आहे. भाजपचे (BJP) पाप लपविण्यासाठी एखादा पिल्लू काढायचा, त्याचा इशू करायचा, हे आजचं नाही. गेल्या अनेक वर्षापासून चालू आहे. लोकशाही संपुष्टात आणायला भाजप निघाली आहे.**

लोकशाहीचा गळा घोटायला ते निघाले आहे. तुम्ही तर आता साऱ्या दुनियेची मिमिक्री करत आहात. नरेंद्र मोदी (PM Modi) काय करतायेत? अमित शहा काय करतायेत? भाजपचे नेते काय करतायेत? देशात हिंदू-मुसलमानांमध्ये वाद निर्माण करणे, महाराष्ट्रात मराठा ओबीसी मध्ये वाद निर्माण करणं. या पद्धतीने जी तणाव परिस्थिती तुम्ही निर्माण केली आहे, त्याचं उत्तर पहिले दिलं पाहिजे. या पद्धतीचं सगळं पाप लपविण्यासाठी, प्रकरण दाबण्यासाठी भाजपा निघायली असेल, तरी भाजपाचं हे कुणी ऐकायला तयार नाहीत.

भाजपाची तानाशाही,



नरेंद्र मोदी च्या रूपानं या देशात कशी चाललेली आहे, हे सगळ्या जनतेला कळलेलं आहे. त्याच्यामुळे बीजेपीची मिमिक्री होईल अशी परिस्थिती आज देशात निर्माण झाली आहे. असा टोला कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपला लगावला. संसदेत उपराष्ट्रपतींची मिमिक्री केल्याच्या निषेधार्थ भाजपानं आज राज्यभर आंदोलन केलं, त्यावर नाना पटोले बोलत होते. शंकराचार्य यांचं कालचे मी विधान ऐकलं. या भाजप वाल्यांचे श्रीराम मंदिराशी काहीचं संबंध नाही. कोर्टानं आमच्या बाजूनं निकाल दिला आणि हे कोण आलेत तिथं. हेच जनतेकडून पैसे वसूल करतात. असं शंकराचार्यांचं स्टेटमेंट आहे. त्यामुळं हे निमंत्रण देणारे कोण? असा प्रश्न नाना पटोले यांनी भाजपला विचारला आहे. संतांमध्ये सुद्धा भाजपला मोठा विरोध सुरू झाला आहे. त्यामुळे लालकृष्ण अडवाणी असो, मुरली मनोहर जोशी असो.

### नागपुरातून आवाज गुंजणार

अयोध्या येथील श्रीराम मंदिराच्या उद्घाटन प्रसंगी कॉंग्रेस नेत्या सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खरगे यांना निमंत्रण दिलं. तर, भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी असो की अन्य यांना डावलण्यात आलं यावर नाना पटोले बोलत होते. नागपूर ही बाबासाहेब आंबेडकरांची कर्मभूमी आहे. धम्मचक्र प्रवर्तन बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या भूमीवर केलं आहे. आज देशामध्ये जी काही संविधानिक परिस्थिती संपविण्याची व्यवस्था सुरू झालेली आहे, त्या व्यवस्थेच्या विरोधात तो आवाज स्थापना दिवसाच्या निमित्ताने त्या ठिकाणी पूर्ण देशामध्ये पोहोचविण्याचा काम कॉंग्रेसच्या माध्यमातून केली जाईल. मोठ्या संख्येने लाखोच्या घरात लोक त्या ठिकाणी येतील. असा विश्वास नाना पटोले यांनी नागपूर येथे 28 डिसेंबरच्या विराट सभेसंदर्भात बोलतांना व्यक्त केला. सरकारला प्रश्न चिघळवायचे आहेत, हेच आपल्याला पाहायला मिळालेलं आहे.

# मोदींना उद्देशून 'खिसेकापू' टिप्पणी चुकीची

## » राहुल गांधी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता...

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) यांच्या विरोधात केलेल्या खिसेकापू टिप्पणीवरून काँग्रेस नेते राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांना गुरुवारी (21 डिसेंबर) दिल्ली उच्च न्यायालयाने (DELHI HIGH COURT) दणका दिला आहे. दिल्ली हायकोर्टाने अशाप्रकारची वक्तव्ये करणे टाळले पाहिजे, हायकोर्टाने म्हटले आहे.**

दिल्ली हायकोर्टाने निवडणूक आयोगाला आठ आठवड्यांत या प्रकरणी निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. खरे तर, काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी राजस्थानमध्ये निवडणूक रॅली काढताना पीएम मोदींवर खिसेकापू, पनौती मोदी अशी टीका केली होती. कार्यवाहक मुख्य न्यायाधीश मनमोहन यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले की, कथित विधाने योग्य नाहीत. निवडणूक आयोगाने या प्रकरणाची चौकशी करावी. हायकोर्टाने या संदर्भात राहुल गांधी यांना नोटीसही बजावली आहे. "उत्तर दाखल करण्याची मुदत संपली आहे आणि कोणतेही उत्तर आलेले नाही हे लक्षात घेऊन, न्यायालयाने निवडणूक आयोगाला या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत," असे दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले. 23 नोव्हेंबर रोजी पाठवलेल्या नोटीसमध्ये न्यायालयाने म्हटले होते की, निवडणूक आयोगानेच या प्रकरणी योग्य ती कारवाई करणार असल्याचे सांगितले होते. याचिकाकर्ते भरत नागर यांनी उच्च न्यायालयाला सांगितले की, 22 नोव्हेंबर रोजी राहुल गांधी यांनी पंतप्रधानांसह सर्वोच्च सरकारी पदांवर असलेल्या व्यक्तींवर घृणास्पद आरोप करणारे भाषण केले होते, ज्यामध्ये राहुल गांधी यांनी पंतप्रधानांना खिसेकापू म्हटले होते. काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी 21 नोव्हेंबर रोजी आपल्या वक्तव्यात म्हटले होते की, पीएम म्हणजे पनौती मोदी. मोदी टीव्हीवर येऊन कधी हिंदू-मुस्लीम करतात आणि कधी क्रिकेटच्या सामन्याला जातात. ही वेगळी गोष्ट आहे की तिथे गेल्यावर टीमचा पराभव झाला आहे. नागरिकांचे लक्ष इतर मुद्यांवर वळवणे हे पंतप्रधान मोदींचे काम आहे. खिसेकापूदेखील असेच असतात. दोन खिसेकापू येतात. एक तुमच्यासोबत बोलतो आणि तुमचे लक्ष इतरत्र वळवतो. त्याच वेळी दुसरा खिसेकापू येऊन तुमचा खिसा कापतो. राहुल गांधी यांनी हे वक्तव्य पंतप्रधान मोदींना उद्देशून केले होते. क्रिकेट वर्ल्डकपमध्ये भारताचा पराभव झाला होता. हा अंतिम सामना पाहण्यासाठी पंतप्रधान मोदी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर गेले होते. त्यानंतर सोशल मीडियावर पंतप्रधान मोदी यांना पनौती म्हणण्याचा ट्रेंड सुरू झाला होता. राहुल गांधी यांच्या सभेतही उपस्थितांनी पंतप्रधान मोदींना पनौती म्हटले. त्याचाच धागा पकडून राहुल गांधी यांनी टीका केली. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी एका भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावर दिल्ली उच्च न्यायालयाने आक्षेप घेतला आहे. नुकत्याच झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या काळात काँग्रेसच्या प्रचारावेळी राहुल गांधी यांनी एका रॅलीत भाषण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांना खिसेकापू म्हटलं होतं. राहुल गांधी यांनी २२ नोव्हेंबर रोजी हे वक्तव्य केलं होतं. या वक्तव्याप्रकरणी निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना गेल्या महिन्यात कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे. दरम्यान, उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला या प्रकरणावर आठ आठवड्यांच्या आत निर्णय घेण्यास सांगितलं आहे. राहुल गांधी यांचं ते वक्तव्य चुकीचं होतं, असं उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. राहुल गांधी यांनी राजस्थान आणि मध्य प्रदेशमधील निवडणूक प्रचारसभांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'पनवती' आणि 'खिसेकापू' असा उल्लेख केला होता. त्यामुळे भाजपाने त्यांच्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. एका ज्येष्ठ नेत्याने अशा प्रकारची भाषा वापरणे अशोभनीय आहे, असं आपल्या तक्रारीत भाजपाने म्हटलं होतं. या तक्रारीची दखल घेऊन निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे.

### राहुल गांधी यांचा आरोप तथ्यहीन

» आदर्श आचारसंहिता नेत्यांना आपल्या प्रतिस्पर्ध्यावर असत्यापित आरोप करण्यात मनाई करते, असं या नोटिशीत म्हटलं आहे. राजस्थानमधील बायतू येथील प्रचारसभेत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'पनवती' असं संबोधून त्यांच्यावर टीका केली होती. त्याचबरोबर पंतप्रधानांनी 'अतिश्रीमंतांना कर्जमाफी दिली' अशी टीका केली होती. राहुल गांधी यांनी केलेले आरोप चुकीचे असल्याचे भाजपाने म्हटलं होतं. त्याचबरोबर गेल्या नऊ वर्षांत उद्योगपतींना १४ लाख कोटी रुपयांची कर्जमाफी दिल्याचा राहुल गांधी यांचा आरोप तथ्यहीन आहे, असंही भाजपाने म्हटलं होतं. निवडणूक आयोगाच्या सूचनेमध्ये MCC तरतुदीचा उल्लेख केला आहे, ज्यामध्ये असं म्हटलं आहे की "असत्यापित आरोप किंवा विकृती"वर आधारित टीका टाळली पाहिजे.

# लोकसभेत निलंबन सत्र सुरूच!

## » काँग्रेसच्या 'या' तीन खासदारांवर कारवाई!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**




**संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विरोधी खासदारांचं निलंबन सत्र सुरूच आहे. आजही काँग्रेसच्या तीन खासदारांना निलंबित करण्यात आलं. यामुळे आतापर्यंत निलंबित करण्यात आलेल्या खासदारांची संख्या १४६ वर पोहोचली आहे.**

१३ डिसेंबर रोजी लोकसभेत गदारोळ झाला. प्रेक्षक गॅलरीतून दोघांनी लोकसभेच्या सभागृहात उड्या मारल्या. तसंच सोबत आणलेल्या कॅनमधून त्यांनी पिवळा धूरही सोडला. याप्रकरणी विरोधकांनी गृहमंत्री आणि पंतप्रधानांकडून निवेदन सादर करण्याची मागणी केली. त्यावरून १८ डिसेंबर रोजी राज्यसभा आणि लोकसभेतून एकूण ७८ खासदारांना निलंबित करण्यात आलं होतं. १९ डिसेंबर रोजीही ४९ खासदारांवर निलंबनाची कारवाई केली. यावेळी राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे यांनाही निलंबित केलं. आज २१ डिसेंबर रोजीही काँग्रेसच्या तीन खासदारांना निलंबित करण्यात आलं आहे. काँग्रेसचे लोकसभेतील खासदार डी.के. सुरेश, नकुल नाथ आणि दीपक बैज अशी या निलंबित झालेल्या खासदारांची नावे आहेत. त्यामुळे एकूण निलंबित झालेल्या खासदारांची संख्या आता १४६ झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभागृहात सुरक्षा भंगाच्या मुद्द्यावरून निवेदन न केल्याने त्यांनी संसदेच्या विशेषाधिकाराचे उल्लंघन केले आहे, असे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी ठामपणे सांगितले. तसंच विरोधी पक्षाच्या खासदारांच्या निलंबनाच्या निषेधार्थ गुरुवारी, इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसदेपासून दिल्लीतील विजय चौकापर्यंत मोर्चा काढला. विशेष म्हणजे, खासदारांच्या निलंबनानंतर, संसदेने आज मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवेच्या अटी आणि पदाचा टर्म) विधेयक, २०२३ मंजूर केले. संसदेने दूरसंचार विधेयक, २०२३ देखील मंजूर केले जे सरकारला राष्ट्रीय सुरक्षेच्या हितासाठी दूरसंचार सेवांवर तात्पुरते नियंत्रण ठेवण्याची आणि उपग्रह स्पेक्ट्रमच्या वाटपासाठी नॉन-लिलाव मार्ग प्रदान करण्याचा प्रयत्न करते.

# संसद भवनाच्या सुरक्षेची जबाबदारी आता CISF कडे

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

लोकसभेचं कामकाज सुरू असताना दोन तरुणांनी सभागृहात घुसून राडा केल्याच्या घटनेनंतर संसदेच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, केंद्र सरकारने संसद भवन परिसराच्या सुरक्षेची जबाबदारी सेंट्रल इंडस्ट्रियल सिक्योरिटी फोर्सकडे (सीआयएसएफ) सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. सीआयएसएफ हे केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आहे, जे देशातील वेगवेगळ्या सरकारी संस्था, मंत्रालयांच्या इमारती, अणुऊर्जा प्रकल्प, अंतराळ संस्थेची ठिकाणं आणि विमानतळांना संरक्षण देतं. दरम्यान, केंद्रीय गृह मंत्रालयाने सीआयएसएफला संसद भवन संकुलाचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर आता सीआयएसएफ आणि अग्निशमन दल मिळून संसद परिसरात अधिकारी-कर्मचारी तैनात करण्यासाठी एक आराखडा तयार करतील. संसदेची सुरक्षा व्यवस्था पाहणाऱ्या सुरक्षा पथकासह सीआयएसएफ संसद भवन परिसराचं सर्वेक्षण करणार आहे. आठवडाभर अभ्यास करून सुरक्षेच्या दृष्टीने एक आराखडा तयार करून गृहमंत्रालयासमोर सादर केला जाईल. सीआयएसएफच्या जवानांबरोबर संसदेची सध्याची सुरक्षेची जबाबदारी पाहणारं पथक, दिल्ली पोलीस आणि सीआरपीएफचं पथक संयुक्तपणे संसद भवनाचं संरक्षण करतील. १३ डिसेंबर २०२३ रोजी संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरू असताना दोन तरुणांनी सुरक्षा व्यवस्था भेदून सभागृहात प्रवेश केला. हे दोन तरुण खासदारांच्या बाकांवरून उड्या मारत धावत सुटले.

# प्रथमेश आणि मुग्धा अडकले लग्नबंधनात

'सारेगमप लिटिल चॅम्प्स' फेम मुग्धा वैशंपायन (MUGDHA VAISHAMPAYAN) आणि प्रथमेश लघाटे (PRATHAMESH LAGHATE) यांचा लग्नसोहळा पार पडला आहे. या दोघांनी दापोली येथे लग्नगाठ बांधली. मुग्धा आणि प्रथमेश यांच्या लग्नसोहळ्याला त्यांच्या मित्रमैत्रीणींनी आणि कुटुंबानी हजेरी लावली होती. गायक रोहित राऊत आणि जुईली जोगळेकर यांनी देखील मुग्धा आणि प्रथमेश यांच्या विवाह सोहळ्याला हजेरी लावली. जुईली आणि रोहित यांनी मुग्धा आणि प्रथमेश यांच्या लग्नसोहळ्यातील फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. जुईलीनं सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये मुग्धा आणि



प्रथमेश हे एकमेकांना वरमाला घालताना दिसत आहेत. तसेच रोहितनं देखील मुग्धा आणि प्रथमेश यांच्या लग्नसोहळ्यातील एक फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. या फोटोला त्यानं कॅप्शन दिलं, "खूप खूप शुभेच्छा! माऊ आता सौ मुग्धा प्रथमेश लघाटे झाली आहे, यावर अजूनही विश्वास बसत नाही." लग्नसोहळ्यासाठी मुग्धा आणि प्रथमेशनं रॉयल लूक केला होता. पिवळ्या रंगाची साडी, सोनेरी रंगाचे दागिने असा लूक लग्नसोहळ्याला केला होता. प्रथमेशनं लाल रंगाचा कुर्ता परिधान केला होता. काल प्रथमेश आणि मुग्धा यांचा हळदीचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे फोटो दोघांनी सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. 'सारेगमप लिटिल चॅम्प्स'च्या पहिल्या पर्वात मुग्धा आणि प्रथमेश सहभागी झाले होते. 2008 साली हा कार्यक्रम प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या कार्यक्रमादरम्यान त्यांची चांगली मैत्री झाली. मुग्धा आणि प्रथमेश यांच्या लग्नसोहळ्याला त्यांच्या मित्रमैत्रीणींनी आणि कुटुंबानी हजेरी लावली होती.

# बॉलिवूडमध्ये डेब्यू करणार निसा?



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता अजय देवगण (AJAY DEVGN) आणि रोहित शेट्टी (ROHIT SHETTY) यांनी नुकतीच करण जोहरच्या (KARAN JOHAR) कॉफी विथ करण (KOFFEE WITH KARAN 8) या कार्यक्रमामध्ये हजेरी लावली. या शोमध्ये अजय देवगण आणि रोहित शेट्टी यांनी अनेक मुद्द्यांवर चर्चा केली. मुलगी निसाच्या ट्रोलिंगबाबत देखील करणनं या शोमध्ये अजयला विचारलं. तसेच अजयनं निसाच्या बॉलिवूड डेब्यूबद्दल देखील सांगितलं. करण जोहरसोबत बोलताना अजयनं निसाच्या सोशल मीडियावर होणाऱ्या ट्रोलिंगबाबत सांगितलं, तो म्हणाला, "निसाला हे अजिबात आवडत नाही. मलाही हे आवडत नाही. पण तुम्ही ते बदलू शकत नाही. त्यासोबत जगावे लागेल. काही लोक तुमच्याबद्दल निरर्थक बोलतात याचा अर्थ जग तुमच्याबद्दल असेच विचार करते असे नाही. तुम्ही लोकांबद्दल चांगल्या गोष्टी लिहिता, पण ते वाचण्यात कोणालाच रस नाही." याबाबत रोहित शेट्टी म्हणाला, 'प्रत्येकजण ट्रोल होत आहे.' निसाला तिच्या लूक्सवरुन अनेकजण ट्रोल करतात. निसा बॉलिवूडमध्ये डेब्यू करणार का? असा प्रश्न करण जोहरनं कॉफी विथ करणमध्ये अजयला विचारला. या प्रश्नाचं उत्तर देताना करण म्हणाला, सध्या तिला चित्रपटसृष्टीत येण्याची इच्छा नाही. पण भविष्यात काही बदल झाले तर ती त्याचा विचार करेल.

# अभिनेत्रीचं कौतुक करताना मनोज वाजपेयी थांबेना!

मराठी चित्रपट, नाट्य विश्वामध्ये आपल्या अभिनयानं चाहत्यांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केलेली अभिनेत्री म्हणून अमृताचे नाव घ्यावे लागेल. केवळ हिंदी, मराठीच नाहीतर वेगवेगळ्या भाषांमधील चित्रपटांमध्ये अमृतानं केलेला अभिनय हा चाहत्यांच्या मनात घर करुन आहे. सध्या सोशल मीडियावर व्हायरल झालेला तो व्हिडिओ नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतो आहे. अमृताच्या सास बहु आचार प्रायव्हेट लिमिटेड चित्रपटाला मिळालेला पुरस्कार ही अमृतासाठी मोठी गोष्ट आहे. त्यातील भूमिकेसाठी तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीच्या पुरस्कारानं गौरवण्यात आले. हा पुरस्कार प्रसिद्ध अभिनेता मनोज वाजपेयीच्या हस्ते देण्यात आला. यावेळी मनोजनं अमृताचं केलेलं कौतुक सोशल मीडियावर नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे.

# इंटीमेट सीनवर तमन्नाचं रोखठोक उत्तर

साउथची लोकप्रिय अभिनेत्रीने जिने केवळ दाक्षिणात्य मनोरंजन विश्वापर्यंतच मर्यादित न राहता आपल्या अभिनय आणि मेहनतीच्या जोरावर बॉलिवूडमध्येही वेगळ स्थान निर्माण केलं आहे. आज तमन्ना भाटियाचा वाढदिवस. 'बाहूबली' फेम तमन्ना काही दिवसांपूर्वी लस्ट स्टोरीज या तिच्या वेबसिरिजमुळे खुपच चर्चेत आली आहे. तिने 'लस्ट स्टोरीज 2' या वेब सीरिजमध्ये काम केले आणि तिच्या इंटिमेट सीनमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. ही वेब सिरीज 29 जून रोजी OTT वर रिलीज झाली होती, ज्यामध्ये तमन्ना आणि विजय वर्मा एकत्र दिसत आहे. या सिरिजमध्येही तमन्नाने विजयसोबत अनेक इंटिमेट सीन्स आहेत. तमन्नाने या सिरिजसाठी तिची नो किंसींग पॉलिसीही तोडली होती. तिच्या या सीनची खुपच चर्चा झाली. रोमॅंटिक सीनमुळे तिला खुप ट्रोलही करण्यात आले आहे.आज तमन्ना भाटियाचा वाढदिवस. 'बाहूबली' फेम तमन्ना काही दिवसांपूर्वी लस्ट स्टोरीज या तिच्या वेबसिरिजमुळे खुपच चर्चेत आली आहे. तिने 'लस्ट स्टोरीज 2' या वेब सीरिजमध्ये काम केले आणि तिच्या इंटिमेट सीनमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. ही वेब सिरीज 29 जून रोजी OTT वर रिलीज झाली होती, ज्यामध्ये तमन्ना आणि विजय वर्मा एकत्र दिसत आहे.



# एकाच वेळी हसायला आणि रडायला लावणारा डंकी

बॉलिवूडचा 'किंग' अर्थात शाहरुख खानचा डंकी चित्रपट गुरुवारी प्रदर्शित झाला आहे. यंदाच्या वर्षातील किंग खानचा हा तिसरा सिनेमा आहे. राजकुमार हिरानी यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. या चित्रपटामध्ये शाहरुख खानसह तगडी स्टारकास्ट आहे. यामध्ये तापसी पन्नू, विकी कौशल आणि बोमन ईराणी यांचाही दमदार अभिनय पाहायला मिळाला आहे. डंकी चित्रपटाच्या रिलीजचा आनंद शाहरुखच्या चाहत्यांनी मोठ्या धूमधडाक्यात साजरा केला. शाहरुख खान आणि राजकुमार हिरानी यांचा डंकी गुरुवारी प्रदर्शित झाला आहे. जानेवारीमध्ये 'पठाण' आणि सप्टेंबरमध्ये 'जवान' नंतर शाहरुख खानचा या वर्षातील तिसरा रिलीज आहे. चित्रपटाचा भारतातील पहिला शो मुंबईच्या प्रतिष्ठित सिंगल-स्क्रीन थिएटर, गेटी गॅलेक्सी येथे पहाटे 5.55 वाजता प्रदर्शित झाला. डंकीचा फर्स्ट डे फर्स्ट शो हाऊसफुल होता. शाहरुखचया चाहत्यांनी




थिएटरबाहेर जल्लोषही केला. बॉलिवूड टाईमच्या (BOLLYWOOD TIME) रिव्ह्यूनुसार, डंकी हा भावनांचा एक रोलरकोस्टर आहे, ज्याचे दिग्दर्शन हिंदी चित्रपटसृष्टीतील उत्कृष्ट दिग्दर्शकांपैकी एक म्हणजे राजकुमार हिरानी यांनी केले आहे. 1995 मध्ये पंजाबमधील एका गावात सेट केलेले, मुख्य लीड्स त्यांच्या भूमिका उत्तम प्रकारे साकारतात. विकी कौशल त्याच्या मर्यादित स्क्रीनटाइममध्ये एक स्टँडआउट आहे आणि त्याची पंजाबी 'मुंडा'ची भूमिका उत्कृष्ट आहे. अनिल ग्रोव्हर आणि विक्रम कोचर यांनीही उत्तम भूमिका केल्या आहेत आणि ते निश्चितपणे भविष्यातील दोन अभिनेते आहेत. बोमन इराणी आयईएलटीएस शिक्षक म्हणून छान पात्र साकारलं आहे आणि एसआरकेचा समावेश असलेले त्याचे दृश्य तुम्हाला क्लासिक्स मूव्हीजची आठवण करून देतात, जसे की "मैं हूं ना". तापसी पन्नू मुख्य महिला पात्र म्हणून तुम्हाला आश्चर्यचकित करेल. तिची शाहरुखसोबतची केमिस्ट्री अगदी नैसर्गिक दिसते आणि पडद्यावर ही जोडी छान दिसते. शाहरुख संपूर्ण चित्रपटात चमकताना दिसत आहे. विशेषत: जुन्या दृश्यांमध्ये, तो भावनांशी अधिक जुळून येतो. जुन्या दृश्यांमध्ये त्याला नैसर्गिक दिसण्यासाठी VFX टीमचे आभार.

# साक्षी, विनेशने कुस्ती सोडली!

## आम्ही जी लढाई लढत होतो त्यात यश आलं नाही

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय कुस्तीला ऑलिम्पिक स्पर्धेत (OLYMPIC GAMES) चमकावणाऱ्या महिला पैलवान साक्षी मलिक ( SAKSHI MALIK QUIT WRESTLING) आणि विनेश फोगट (VINESH PHOGAT) यांनी अत्यंत मोठा निर्णय घेतला आहे. दोन्ही कुस्तीपटूंनी कुस्तीला रामराम ठोकण्याची घोषणा केली. भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षपदी भाजप खासदार बृजभूषण सिंह (BRIJ BHUSHAN SHARAN SINGH) यांच्याच समर्थकाची नियुक्ती झाली आहे. संजय सिंह (SANJAY SINGH) हे कुस्ती महासंघाचे नवे अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले आहेत.**

मात्र ज्या बृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप करत, तब्बल 40 दिवस दिल्लीत आंदोलन करुनही, त्यांच्याच माणसाची नियुक्ती महासंघाच्या अध्यक्षपदी विराजमान होत असेल, तर कुस्तीला रामराम ठोकलेला बरा, असं म्हणत साक्षी मलिक ढसाढसा रडली. साक्षी मलिकने महिला कुस्ती स्पर्धेत भारताला पहिलं ऑलिम्पिक पदक मिळवून दिलं होतं. साक्षीने 2016 मध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्य पदक पटकावलं होतं. तर विनेश फोगट ही सुद्धा पदक विजेती कुस्तीपटू आहे. विनेशने कॉमनवेल्थ आणि आशियाई स्पर्धा या दोन्ही स्पर्धेत सुवर्णपदक मिळवलं होतं. असा पराक्रम गाजवणारी ती पहिली भारतीय महिला कुस्तीपटू आहे. विनेश फोगट म्हणाली, "संजय सिंह यांना आज कुस्ती महासंघाचे अध्यक्ष करण्यात आले. त्यांना अध्यक्ष केले म्हणजे खेळातील मुलींना पुन्हा बळी पडावे लागेल. आम्ही जी लढाई लढत होतो त्यात यश आलं नाही. देशात आम्हाला न्याय कसा मिळेल हे माहीत नाही. आज कुस्तीचे भवितव्य अंधारात आहे, हे अतिशय दुःखद आहे. दरम्यान, कुस्तीपटूंच्या या लढाईत, भारतीय पैलवान बजरंग पुनियाही सुरुवातीपासून आहे. संजय सिंह यांच्या निवडीनंतर बजरंग पुनिया म्हणाला, आमचा लढा पूर्वी सरकारशी नव्हता आणि आजही नाही. त्याची शक्ती आणि त्यामागे कार्यरत यंत्रणा साऱ्या देशाने पाहिली. 20 मुली



आल्या होत्या आणि त्यांनी त्यांची निवड केली. ही लढाई सर्वानाच लढावी लागणार आहे. आम्ही कधी कुस्ती करू शकू असे वाटत नाही. आमच्यासाठी जातिवाद नाही, पण आम्ही जातिवाद पाळतो असे ते सांगत आहेत. आम्ही राजकारण करण्यासाठी नाही तर आमच्या बहिणी आणि मुलींसाठी लढण्यासाठी आलो आहोत. भाजपचे खासदार आणि भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष असलेले बृजभूषण सिंहांवर लैंगिक छळाचे आरोप आहेत. हे आरोप दुसरे तिसरे कोणी नाही तर खुद्द महिला कुस्तीपटूंनी केले आहेत. ऑलिम्पिक पदकविजेते कुस्तीपटू बजरंग पुनिया आणि साक्षी मलिक, ऑलिम्पियन विनेश फोगट यांच्यासह देशातील अनेक दिग्गज कुस्तीपटूंनी याच वर्षाच्या सुरुवातीला मोठं आंदोलन उभं केलं होतं. तब्बल 40 दिवस हे पैलवान दिल्लीत आंदोलन करत होते. त्यांनी बृजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात आंदोन करत त्यांच्या अटकेची मागणी केली होती. इतकंच नाही तर बृजभूषण शरण यांच्याविरोधात पोक्सो कायद्याअंतर्गत कारवाईची मागणी केली होती. मात्र दिल्ली पोलिसांनी हे कलम लावण्यास मनाई केली होती. मग दिल्ली पोलिसांनी 15 जून 2023 रोजी भाजपचे खासदार बृजभूषण सिंह यांच्या विरोधात 1500 पानांचे आरोपपत्र दाखल केले होते. सहा महिला कुस्तीपटूंनी केलेल्या तक्रारीनंतर हे आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. भारतीय कुस्तीला ऑलिम्पिक स्पर्धेत (OLYMPIC GAMES) चमकावणाऱ्या महिला पैलवान साक्षी मलिक ( SAKSHI MALIK QUIT WRESTLING) आणि विनेश फोगट (VINESH PHOGAT) यांनी अत्यंत मोठा निर्णय घेतला आहे. दोन्ही कुस्तीपटूंनी कुस्तीला रामराम ठोकण्याची घोषणा केली. भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षपदी भाजप खासदार बृजभूषण सिंह (BRIJ BHUSHAN SHARAN SINGH) यांच्याच समर्थकाची नियुक्ती झाली आहे. संजय सिंह (SANJAY SINGH) हे कुस्ती महासंघाचे नवे अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले आहेत. मात्र ज्या बृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप करत, तब्बल 40 दिवस दिल्लीत आंदोलन करुनही, त्यांच्याच माणसाची नियुक्ती महासंघाच्या अध्यक्षपदी विराजमान होत असेल, तर कुस्तीला रामराम ठोकलेला बरा, असं म्हणत साक्षी मलिक ढसाढसा रडली.

### आज कुस्तीचे भवितव्य अंधारात

बृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप करत, तब्बल 40 दिवस दिल्लीत आंदोलन करुनही, त्यांच्याच माणसाची नियुक्ती महासंघाच्या अध्यक्षपदी विराजमान होत असेल, तर कुस्तीला रामराम ठोकलेला बरा, असं म्हणत साक्षी मलिक ढसाढसा रडली. साक्षी मलिकने महिला कुस्ती स्पर्धेत भारताला पहिलं ऑलिम्पिक पदक मिळवून दिलं होतं. साक्षीने 2016 मध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्य पदक पटकावलं होतं. तर विनेश फोगट ही सुद्धा पदक विजेती कुस्तीपटू आहे. विनेशने कॉमनवेल्थ आणि आशियाई स्पर्धा या दोन्ही स्पर्धेत सुवर्णपदक मिळवलं होतं. असा पराक्रम गाजवणारी ती पहिली भारतीय महिला कुस्तीपटू आहे. विनेश फोगट म्हणाली, "संजय सिंह यांना आज कुस्ती महासंघाचे अध्यक्ष करण्यात आले. त्यांना अध्यक्ष केले म्हणजे खेळातील मुलींना पुन्हा बळी पडावे लागेल. आम्ही जी लढाई लढत होतो त्यात यश आलं नाही. देशात आम्हाला न्याय कसा मिळेल हे माहीत नाही. आज कुस्तीचे भवितव्य अंधारात आहे, हे अतिशय दुःखद आहे.

# संजूच्या शतकाच्या जोरावर यजमानांना २९७ धावांचे लक्ष्य

## रिंकूसोबत वॉशिंग्टन सुंदरनेही शानदार इनिंग खेळली

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना गुरुवारी (२१ डिसेंबर) खेळवला जात आहे. पार्ल येथील बोलंड पार्क येथे दोन्ही संघ आमनेसामने आहेत. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करामने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.**



फलंदाजी करताना टीम इंडियाने संजू सॅमसनने झळकावलेल्या शतकाच्या जोरावर ५० षटकांत ८ गडी गमावून २९६ धावा केल्या. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेसमोर २९७ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. दीर्घ कालावधीनंतर टीम इंडियात पुनरागमन करताना संजू सॅमसनने आपल्या वनडे कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले. त्याने ४४व्या षटकातील शेवटच्या चेंडूवर एक धाव घेत आपले शतक पूर्ण केले. त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील हे पहिले शतक आहे. संजू सॅमसनने ११४ चेंडूचा सामना करताना ४ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने १०८ धावा केल्या. लिझाद विल्यमसनच्या चेंडूवर संजू रीझा हेंड्रिक्सकरवी झेलबाद झाला. संजू सॅमसनने पदभार कर्णधार केएल राहुल (२१) सोबत ५० धावांची भागीदारी केली. एकूण १०१ धावांवर केएल राहुल विआन मुल्डरने बाद केला. यानंतर तिलक वर्मासह संजूने डावाची धुरा सांभाळली. संजू आणि तिलक यांच्यात १३५ चेंडूत ११६ धावांची भागीदारी झाली. तिलक वर्मा (५२) संघाच्या २१७६ धावा असताना बाद झाला. त्याला केशव महाराजने बाद केले. रिंकू सिंगने आपल्या शैलीत धावा काढल्या. २७ चेंडूत ३८ धावांची इनिंग खेळून तो बाद झाला. रिंकूसोबत वॉशिंग्टन सुंदरनेही शानदार इनिंग खेळली आणि तो ९ चेंडूत १४ धावा करून बाद झाला. अशा प्रकारे टीम इंडियाने ५० षटकात ८ विकेट गमावून २९६ धावा केल्या. खेळपट्टीचे स्वरूप लक्षात घेता ही विजयी धावसंख्या मानली जात आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून बुरेन हेंड्रिक्सने तीन तर नांद्रे बर्गरने दोन बळी घेतले. लिझार्ड विल्यम्स, व्हियान मुल्डर आणि केशव महाराज यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

### सॅमसनने सावरला इंडियाचा डाव

संजू सॅमसनने पदभार कर्णधार केएल राहुल (२१) सोबत ५० धावांची भागीदारी केली. एकूण १०१ धावांवर केएल राहुल विआन मुल्डरने बाद केला. संजू आणि तिलक यांच्यात १३५ चेंडूत ११६ धावांची भागीदारी झाली. तिलक वर्मा (५२) संघाच्या २१७६ धावा असताना बाद झाला. त्याला केशव महाराजने बाद केले.